# महाराष्ट्र शासन
## बै.जी.शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, पुणे
जयप्रकाश नारायण रोड, पुणे रेल्वे स्टेशन जवळ, पुणे-४११ ००१

email deanbjgmcpune@gmail.com दूरध्वनी क्र.०२०२६१०२३६५ संकेतस्थळ- फॅक्स क्र.२६१२६८६८


जा.क्र.बैजीशावैम/राजप/जाहीरात/करार/10376/२०२५ दि.26/8 /२०२५

प्रति,

मा.उप-संचालक,

माहिती व प्रसिध्दी संचालनालय,

मध्यवर्ती इमारत,

पुणे.

विषय: प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक (चिकित्सालयीन व अतिविशेषोपचार विषय) या पदासाठी करार तत्वावर तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याबाबत...

संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील बै.जी.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे येथील आस्थापनेवरील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक (अतिविशेषोपचारशास्त्र व चिकित्सालयीन विषय) ही पदे करार तत्वावर तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याबाबत या पत्रासोबत जोडण्यात येत असलेली जाहिरातीची सूचना जास्त खप असलेल्या अग्रगण्य वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्द करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| ०१ | कार्यालयाचे नाव, दुरध्वनी व ई - मेल पत्ता | ससून सर्वोपचार रुग्णालय,व बै.जी.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे.<br>दुरध्वनी क्रमांक.०२०२६१०२३८०<br>ई मेल: deanbjgmcpune@gmail.com |
| ०२ | जहिरातीची सूचना प्रसिध्द करण्याची अंतिम तारीख | दि. 8/9/2025 |
| ०३ | प्रसिध्दीचे स्वरुप | विभागीय |
| ०४ | प्रसिध्दीकरीता शिफारस करण्यात आलेले वृत्तपत्र | जास्त खप असलेल्या विभागीय अग्रगण्य एक मराठी व एक इंग्रजी वर्तमानपत्रामध्ये. |
| ०५ | किती वेळा प्रसिध्द करावयाची आहे | एकवेळ |
| ०६ | देयक प्रदान करण्याकरीता कोणत्या नावाने पाठविण्यात यावे | बै.जी.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे. |

सेबत :- जाहिरातीची सूचना

(डॉ.एकनाथ पवार)

अधिष्ठाता,

बै.जी.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,पुणे

महाराष्ट्र शासन
# बै.जी.शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे
जयप्रकाश नारायण रोड, पुणे रेल्वे स्टेशन जवळ, पुणे-४११ ००१
email deanbjgmcpune@gmail.com दूरध्वनी क्र.०२०२६१०२३६५ संकेतस्थळ- फॅक्स क्र.२६१२६८६८

जा.क्र.बैजीशावैम/राजप/जाहीरात/करार/10376 /२०२५ दि.26/08/२०२५

## :जाहिरात:

विषयः वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील संस्थेचे नाव येथील चिकित्सालयीन तसेच अतिविशेषोपचार विभागातील विविध विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील रिक्त पदे मध्यवर्ती निवड प्रक्रियेमार्फत करार तत्वावर तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याबाबत...

संदर्भः १. शा.नि सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३,दि.१७.१२.२०१६
२. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र.एलईसी-२०२१/प्र.क्र.१९९ /वैसेवा-३, दि.०९.०२.२०२२

वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील बै.जी.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय पुणे येथील चिकित्सालयीन व अतिविशेषोपचार विभागातील विविध विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील रिक्त असलेली पदे करार तत्वावर ३६४ दिवसांकरीता तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याकरीता इच्छुक पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

इच्छुक पात्र उमेदवारांकडून मागविण्यात येत असलेले अर्ज संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या www.med-edu.in या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांक. ८/९/२०२५ ते दिनांक. १८/९/२०२५ रोजीपर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (शासकीय सुट्टी वगळून) अर्ज ऑफलाईन पध्दतीने या संस्थेच्या कार्यालयात स्विकारले जातील. उमेदवाराने शैक्षणिक अर्हता, अनुभव प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे सदर अर्जासोबत सादर करणे अनिवार्य राहील. करार तत्वावर नियुक्तीबाबतची माहिती संचालनालयाच्या संकेत स्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.

(डॉ.एकनाथ पवार)
अधिष्ठाता,
बै.जी.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,पुणे.

# बे.जी.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रिक्त पदांचा तपशील

## संवर्ग: "प्राध्यापक" बे.जी.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,पुणे.

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>विषयाचे नाव</th><th>पद संख्या</th><th>शैक्षणिक अर्हता</th><th>अनुभव</th></tr>
<tr><td>१</td><td>अस्थिव्यंगोपचाशास्त्र</td><td>१</td><td>M.S. (Orthopaedics)/<br>DNB (Orthopaedics)/</td><td rowspan="2">As per notification 14-02-2022<br><br>i) Associate Professor in the subject for 3 years in a permitted/Approved/recognize medical college/institution<br><br>ii) Should have at least four Research Publications(at least two as Associate Professor) (only original papers, meta-analysis, systematic reviews and case series that are published in journals indexed in Mediline, Pubmed Central, Citation index, Expanded Embase, Scopus, Directory of Open Excess journals (DOaj) will be considered) .<br><br>The author must be amongst first three or should be the corresponding author.<br><br>iii) Should have completed the basic course in biomedical research from institution (s) designated by NMC.</td></tr>
<tr><td>२</td><td>मनोविकृतीशास्त्र</td><td>१</td><td>M.D.(Psychiatry)<br>M.D.(Psychological Medicine)/<br>M.D(Medicine with Diploma in Psychological Medicine/<br>DNB (Psychiatry)</td></tr>
<tr><td></td><td>एकुण पदे</td><td>२</td><td></td><td></td></tr>
</table>

संवर्ग: "सहयोगी प्राध्यापक" ब.जो.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,पुणे.

| अ. क्र. | विषयाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | औषधवैद्यकशास्त्र | १ | M.D. (General Medicine/ DNB (General Medicine) | As per notification 14-02-2022<br>i) Assistant Professor in the subject for 4 years in a permitted/Approved/recognize medical college/institution<br>ii) Should have at least two Research Publications (only original papers, meta-analysis, systematic reviews and case series that are published in journals indexed in Mediline, Pubmed Central, Citation index, Expanded Embase, Scopus, Directory of Open Excess journals (DOaj) will be considered).<br>The author must be amongst first three or should be the corresponding author.<br>iii) Should have completed the basic course in biomedical research from institution (s) designated by NMC. |
| २ | क्षयरोगशास्त्र | १ | M.D. (Tuberculosis)/M.D(Tubereulosis & Respiratory Diseases)/M.D (Medicine with T.D.D.,DTD OR D.T.C.D)/M.D (TB and Chest Diseases)/DNB (Respiratory Diseases) | |
| ३ | त्वचा व गुप्तरोगशास्त्र | १ | M.D. (Dermatology and Venereology)/M.D (Dermatology, Venereology and Leprosy)/M.D(Dermatology)/M.D (Dermatlogy including Venereology/Leprosy)/M.D(medicine with D.V.D OR D.D)/ DNB (Dermatology and Venereology) | |
| ४ | शल्यचिकित्साशास्त्र | २ | M.S. (General Surgery)/ DNB (General Surgery) | |
| ५ | अस्थिव्यंगोपचाशास्त्र | १ | M.S. (Orthopaedics)/ DNB (Orthopaedics)/ | |
| ६ | क्ष - किरणशास्त्र | २ | M.D. (Radio-diagnosis/M.D. (Radiology) /DNB (Rediology) | |
| ७ | इंटरव्हेंन्शनल रेडिओलॉजी | १ | DM (Interventional Radiology) | |
| | एकुण पदे | ९ | | |

टीप - सदर जाहिरातीमधील नमुद पदसंख्येत बदल करणे/सदरची जाहिरात पुर्णतः रद्द करण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीतांनी स्वतःकडे राखून ठेवला आहे.

महत्त्वाची टीप :

१) उमदेवार हा भारताचा नागरीक व महाराष्ट्रातील रहिवासी असावा.

२) उमेदवाराचे वय नियुक्ती वेळेस कमाल ६९ वर्षापेक्षा जास्त नसावे.

३) प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांना करार पध्दतीने नियुक्तीसाठी त्या-त्या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अध्यापकांबरोबरच कोणत्याही वयोगटाचे राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने विहीत केलेली आवश्यक अर्हता धारण करणारे खाजगी वा अन्य क्षेत्रातील उमेदवार (बिगर सेवानिवृत्त) पात्र असतील.

४) मानधन -

(अ) सेवानिवृत्त अध्यापकांची करार पध्दतीने नियुक्ती झाल्यास त्यांना शासन निर्णय दिनांक १७.१२.२०१६ मधील तरतुदीनुसार दरमहा मानधन अनुज्ञेय असेल.

(ब)खाजगी वा अन्य क्षेत्रातील उमेदवार (बिगर सेवानिवृत्त) यांना खालीलप्रमाणे दरमहा मानधन अनुज्ञेय असेल.

| अ.क्र. | पद | विषय | दरमहा मानधन |
|---|---|---|---|
| १ | प्राध्यापक | चिकित्सालयीन - पुणे | रु.१,८५,०००/- |
| २ | प्राध्यापक | अतिविशेषोपचार | रु.२,३०,०००/- |
| ३ | सहयोगी प्राध्यापक | चिकित्सालयीन - पुणे | रु.१,७०,०००/- |
| ४ | सहयोगी प्राध्यापक | अतिविशेषोपचार | रु.२,१०,०००/- |

६) गुणांकन पध्दत :- जाहिरातीसोबत जोडलेल्या परिशिष्ट -अ मध्ये नमुद करण्यात आलेली आहे.

परिशिष्ट अ मध्ये नमूद नुसार अ.क्र.१ ते ४ वरील एकूण ८५ गुणांच्या आधारे तात्पुरती गुणवत्ता यादी तयार करुन त्यानुसार उमेदवारांना प्रत्यक्ष कागदपत्र पडताळणी व मुलाखतीस पात्र ठरविण्यात येईल. प्रत्यक्ष कागदपत्र पडताळणी व मुलाखती अंती १०० गुणांपैकी किमान ४१ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या उमेदवारांचाच करार तत्वावरील नियुक्तीकरीता विचार केला जाईल.

नियम व अटी -

१) करार पध्दतीने नियुक्तीचा कालावधी हा नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा ३६४ दिवसांचा कालावधी यापैकी जे अगोदर घडेल इतका राहील. तथापि सदरहु पदावर नियमित उमेदवार उपलब्ध झाल्यास कंत्राटी उमेदवाराच्या पदस्थापनेत बदल करुन देण्याचे अधिकार आयुक्त यांना राहतील.

२) उमेदवाराचे कामकाज समाधानकारक नसल्यास, गंभीर स्वरुपाची अनियमितता व गैरवर्तणूक या कारणासाठी त्याची नियुक्ती कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय संपुष्टात येईल.

३) करार पध्दतीने नियुक्त उमेदवाराने प्रस्थापित मानकांनुसार अध्यापन, रुग्णसेवा व अधिष्ठाता यांनी नेमून दिलेली विवक्षित कामे पार पाडणे आवश्यक राहील.

४) वरीलप्रमाणे विहीत कामकाज पार पाडल्यानंतर महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदाऱ्यांवर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन उमेदवारास खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्याची मुभा राहील.

५) करार पध्दतीने नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही, तसेच सदर कालावधी कोणत्याही सेवा प्रयोजनासाठी ग्राहय् धरला जाणार नाही.

६) करार पध्दतीने नियुक्त उमेदवारास त्याच्या सेवा कालावधीत केवळ नैमत्तीक रजा अनुज्ञेय असतील.

७) करार पध्दतीने नियुक्त करंण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे /माहिती आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

८) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.

९) उमेदवारास नियुक्ती देण्यात आल्यानंतर किमान एक शैक्षणिक सत्र संपेपर्यंत त्यास कोणत्याही परिस्थितीत सेवा सोडता येणार नाही. तशा आशयाचे शपथपत्र उमदेवारास नियुक्तीपुर्वी सादर करणे बंधनकारक असेल. असे शपथपत्र सादर करणाऱ्या उमेदवारासच करार पध्दतीने नियुक्ती देण्यात येईल. शैक्षणिक सत्र चालू असलेल्या कालावधीत विद्यार्थीहीत विचारात घेता उमेदवाराचा राजीनामा कोणत्याही परिस्थितीत स्विकारला जाणार नाही.

१०) बिगर सेवानिवृत्त गटातून करार पध्दतीने नियुक्त होणाऱ्या अध्यापकाची नंतरच्या काळात नियमित नियुक्ती झाल्यास त्याला पूर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.

११) अर्जदाराने संबंधित पदासाठी शरीरीकदृष्टया पात्र असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे.

१२) सदर जाहिराती मधील नमूद पदसंख्येत बदल करणे/सदरची जाहिरात पुर्णत: रद्द करण्याचा अधिकार अधिष्ठाता यांनी स्वत:कडे राखून ठेवला आहे.

१३) नमूद रिक्त पदांच्या संख्येत बदल करणेबाबतचे सर्व अधिकार अधिष्ठाता यांना राहतील.

१४) अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरीत्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

१५) अर्जदाराचे नाव महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनियम १९६५ च्या अंतर्गत कायम नोंदणी केल्याबाबतचे प्रमाणपत्र किंवा भारतीय वैद्यकीय परिषदेचे कायम नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१६) उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. (मुलाखतीचे वेळापत्रक वेगळयाने कळविण्यात येईल.)

१७) मुलाखतीला येताना उमेदवारांनी अर्जासोबत सादर केलेल्या सर्व दस्तऐवजांचे मुळ कागदपत्रे सोबत आणणे बंधनकारक राहील.

(डॉ.एकनाथ पवार)
अधिष्ठाता,
बै.जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे.

| Sr.No | Topics | Marks |
|---|---|---|
| 1. | Qualification-<br>7. MS/MD/DM/Mch/DNB- 10 Marks<br>8. MBBS (Aggregate marks of all years)<br>65% to 70% and above – 20 marks<br>60% to 65% - 15 marks<br>55% to 60% - 10 marks<br>50% to 55% - 05 marks<br>9. XII th (Aggregate marks)<br>70% to 80% and above – 20 marks<br>60% to 70% - 15 marks<br>50% to 60% - 10 marks<br>40% to 50% - 05 marks | 50 |
| 2. | Additional Qualification in concerned subject (DNB/CPS/Phd/Fellowship) | 5 |
| 3. | Teaching experience in concerned specially (Mandatory)<br>**For Professor 3 years teaching experience as Associate Professor- 10 marks & 1 mark each for additional year as an Associate Professor.<br>**For Associate Professor 4 years teaching experience as Assistant Professor- 10 marks. & mark each for additional year as Assistant Professor) | 20 |
| 4. | Research paper publications (Mandatory)<br>**For Professor 4 Research publications (Atleast 2 as Associate Professor) - 05 marks. & 1 mark each for additional publication.<br>**For Associate Professor 2 Research publications- 05 marks & 1 mark each for additional publication. | 10 |
| 5. | Interview | 15 |
| | TOTAL | 100 |

Note-

7. Candidate must upload all relevant documents as proof.
8. Provisional Merit list to call candidates for interview will be prepared as per marks obtained in Serial No 1 to 4 ( Total Marks obtained out of 85 marks)
9. All appointments shall be done as per MCI/NMC rules. (for rules please refer Gazzete Notification Teachers Elligibility Qualifications in Medical Institutions regulations. 2022 Dt.14.02.2022)